# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक 04/12/2020 (शुक्रवार)

---

## अंमली पदार्थ (गांज्या) विक्रेत्यास अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

१) पोलीस ठाणे खापरखेडा :– अंतर्गत दिनांक ०३/१२/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरिष्ठांचे आदेशान्वये गस्तीवर असता मौजा देहेगाव शिरातील किल्ले कोलार येथिल एका बंद हॉटेलसमोर एक इसम हा अंमली पदार्थ (गांज्या) बाळगुन लोकांना विकत असल्याबाबत गोपनिय सुत्रांकडुन खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार सदरची बातमी वरिष्ठांना अवगत करुन किल्ले कोलार येथिल बंद हॉटेल जवळ सापाळा रचुन पाहणी केली असता मोहम्मद फिरोज फारुख शेख, वय ३४ वर्षे, रा. कोराडी नाका, नागपूर हा हजर मिळून आला. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ ५४०.०३ ग्रॅम अंमली पदार्थ (गांज्या) किंमत ५,१००/– रु. मिळून आला. सदरचे अंमली पदार्थ त्याचेकडुन कायदेशिररित्या हस्तगत करुन त्यास अटक करण्यात आली आणि त्याचेविरुद्ध पोलीस ठाणे खापरखेडा येथे कलम २० एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, सहा. पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मीप्रसाद दुबे,पोलीस हवालदार विनोद काळे, पोलीस नाईक दिनेश आधापुरे, शैलेश यादव, सत्यशिल कोठारे, पोलीस शिपाई विरेंद्र नरड, अमोल वाघ, चालक स. फौ. साहेबराव बहाळे, चालक पोलीस हवालदार भाऊराव खंडाते यांनी यशस्वी केली.

## सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर कार्यवाही

नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांचे निर्देशानुसार जिल्ह्यात अंमली पदार्थ विरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. सदर मोहिमे दरम्यान दिनांक ०३/१२/२०२० रोजी जिल्ह्यातील पोलीस ठाणे खापा, कन्हान, भिवापूर, पारशिवनी, कोंढाळी, काटोल, मौदा, उमरेड, बुटीबोरी, सावनेर कळमेश्वर अंतर्गत सर्वाजनिक ठिकाणांवर अंमली पदार्थ जवळ बाळगुन सेवन करणाऱ्या १७ इसमांवर एन.डी.पी.एस. अधिनियमाच्या विविध कलमान्वये कार्यवाही करुन त्यांना अटक करण्यात आली. सदर कार्यवाहीमध्ये अटक करण्यात आलेल्या इसमांकडुन गांज्या, गर्द

यासारखे अंमली पदार्थ व ते सेवन करण्यासाठी लागणारे साहित्य चिलम, सुती कापड, आगपेटी ईत्यादी हस्तगत करण्यात आले.

## अपघातात मृत्यु

१) पोलीस ठाणे बुटीबोरी :— अंतर्गत दिनांक ०२/१२/२०२० रोजी मौजा आसोला शिवारात ॲक्टीवा क्र. एमएच ३२/एएल १४५९ चा चालक आशिष बाबुराव चरडे, वय ३० वर्षे, रा. वर्धा याने आपले वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन समोरुन जाणाऱ्या अज्ञात वाहणास धडक मारल्याने गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावला. सदर प्रकरणी प्रतिक यशवंत नगराळे, वय ३३ वर्षे, रा. धन्वंतरी नगर, वर्धा यांचे तक्रारीवरुन मृतक आशिष बाबुराव चरडे हा स्वत:च स्वत:च्या मरणास कारणीभुत झाल्याने त्याचे विरुद्ध पोलीस ठाणे बुटीबोरी येथे कलम २७९, ३३७, ३३८, ३०४( अ) भादंवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री असलम हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीस फुस लवुन पळवुन नेले

१) पोलीस ठाणे कोंढाळी :— अंतर्गत मौजा दोडकी येथे दिनांक ०२/१२/२०२० रोजी २०.३० वा. ते २२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी महिलेची मुलगी घरासमोर शेकोटीवर हात शेकत असता कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले. सदर प्रकरणी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कोंढाळी येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री राम ढगे हे करीत असुन अल्पवयीन मुलगी व आरोपीचा शोध सुरु आहे.

## गोवंशीय प्राण्यांची अवैध वाहतुक

१) पोलीस ठाणे केळवद :— अंतर्गत मौजा बिहाडा फाट्याजवळ काही इसम हे लेलॅन्ड कंपनीच्या कंटेनर क्र. एचआर ३८/ टी ९७७४ मध्ये कोणत्याही प्रकारचे परवाना व कागदपत्रे न बाळगता आपले कंटेनरमध्ये एकुण ५४ हेले (म्हशी) किंमत ५४,०००/— रु. चे अत्यंत क्रुरतेने आणि दाटीवाटीने कोंबुन कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतुक करतांना मिळून आले. सदर प्रकरणी १) रहीस सरीफ अहमद, वय ४५ वर्षे, रा. मुजफर नगर (उ.प्र.), २) आशिक उमर मोहम्मद, वय २० वर्षे, रा. गुडगाव हरियाणा, ३) आसिफ मोहम्मद जावेद, वय ३६ वर्षे, रा. सितामड्डी, बिहार, ४) मोहम्मद हबीब मोहम्मद बशीर, वय ३२ वर्षे, रा.मधूबनी, बिहार, ५)इखलास फकरु कुरेशी, वय ३४ वर्षे, रा. पलवल, हरियाणा, ६) निहमत उल्ला मोमताज उल्ला, वय ३५ वर्षे, रा. मेरठ (उ.

प्र.) यांना अटक करण्यात आली असुन त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे केळवद येथे पोलीस शिपाई सचिन येलकर यांचे तक्रारीवरुन कलम ३४ भादंवि सहकलम ३, ११, ११ (१) (घ) (ड) (च) (ट) प्राण्यांना निर्दयतेने वागविणे प्रतिबंध अधिनियम १९६० सहकलम १३२/१७७, १८४, १९२ अ मोवाका सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री पंकज वाघोडे हे करीत आहेत.

## सेल्फी काढतांना पाण्यात बुडुन मृत्यु

१) पोलीस ठाणे उमरेड :– अंतर्गत दिनांक ०२/१२/२०२० चे १४.१० वा. ते १४.४० वा. दरम्यान मृतक प्रविण हंसराज मेश्राम, वय २४ वर्ष, रा. आडेगाव देश, ता. चिमुर जि. चंद्रपुर हा गॅस सेगडी दुरुस्तीचे कामानिमित्त जात असतांना मौजा शिवापूर येथिल तलावाचे पुलावर सेल्फी काढण्यासाठी थांबला. सेल्फी काढतांना तोल जावुन पाण्यात बुडुन मरण पावला. सदर प्रकरणी अमोल रमेश चौधरी, वय २४ वर्षे, रा. दिघोरा, भिवापूर यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे उमरेड येथे अकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस नाईक भोजराज झाडे हे करीत आहेत.